लोकमत इफेक्ट : व्हीआयपी थाट बाजूला करून प्रवाशांसोबत केला प्रवास

अधिकारी आले सामान्य बोगीत

संतोष हिरेमठ ।
लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : रेल्वेमंत्र्यांच्या सूचनेनंतरही दौऱ्याच्या नावाखाली दक्षिण मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा 'व्हीआयपी' थाट सुरूच होता. हा प्रकार 'लोकमत'ने वृत्त प्रकाशित करून समोर आणताच खडबडून जागे झालेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी 'व्हीआयपी' संस्कृतीला दूर करून अखेर सामान्य बोगीतून प्रवास करणे सुरु केले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांना सामान्य बोगीत पाहून रेल्वे प्रवासीदेखील थक्क होऊन जात आहेत.

दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक विनोदकुमार यादव यांनी शनिवारी काचीगुडा ते जेडचेर्लापर्यंत काचीगुडा-चेन्नई एग्मोर एक्स्प्रेसमधून प्रवास केला. यावेळी त्यांनी स्लीपर क्लास बोगीतून प्रवास करून प्रवाशांबरोबर संवाद साधून रेल्वेच्या सुविधांविषयी विचारपूस केली. त्यानंतर त्यांनी कर्नुल सिटी-काचीगुडा तुंगभद्रा एक्स्प्रेसमधून परतीचा प्रवास केला. या रेल्वेतही त्यांनी सामान्य बोगीतून प्रवास करून प्रवाशांबरोबर संवाद साधला.

रेल्वे अधिकारी जेव्हा प्रवास करतात तेव्हा त्यांचा राजेशाही थाट दिसतो. त्यांच्यासाठी रेल्वेला विविध सोयी-सुविधांनी सुसज्ज असे सलून अथवा 'एक्झिक्युटिव्ह क्लास'ची बोगी जोडली जाते. परंतु अधिकाऱ्यांनी ही शानशोकी बंद करावी आणि रेल्वेच्या नियमित स्लीपर व थ्री-टियर बोगीतून प्रवास करून प्रवाशांमध्ये मिसळावे, अशी सूचना रेल्वेमंत्र्यांनी ऑक्टोबरच्या प्रारंभी केली.

परंतु रेल्वेमंत्र्यांच्या सूचनेनंतरही रेल्वे अधिकाऱ्यांचा 'व्हीआयपी' थाट काही केल्या जात नव्हता. दक्षिण मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांच्या दौऱ्यात व्हीआयपी संस्कृतीचे दर्शन प्रवाशांना घडतच होते.

विशेष म्हणजे अधिकाऱ्यांनी प्रवाशांमध्ये मिसळावे, असे आदेश असताना सोयी-सुविधांनी सज्ज अशा निरीक्षण बोगीतून प्रवास केला गेला. हा प्रकार 'लोकमत'ने वृत्त प्रकाशित करून समोर आणला.

विनोदकुमार यादव यांनी पहिल्याच वार्षिक निरीक्षणाचे निमित्त साधून २८ जानेवारीला विशेष बोगीने औरंगाबादला आल्यानंतर शिर्डी आणि शनि शिंगणापूरला जाऊन देवदर्शन केले होते. हा प्रकारही 'लोकमत'ने उघडकीस आणला होता.

अखेर 'दमरे'च्या महाव्यवस्थापकांनी सामान्य बोगीतून प्रवास सुरु केला आहे. त्यामुळे त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून इतर अधिकाऱ्यांनाही सामान्य बोगीतून प्रवास करावा लागणार आहे.

ट्विटरवर चर्चा

- ◆ पहिल्यांदाच 'दमरे'च्या महाव्यवस्थापकांनी सामान्य प्रवाशांसोबत केलेला प्रवास पाहिल्याचे मत अनेकांनी ट्विटरवर व्यक्त केले. यातूनच रेल्वेला चांगले दिवस येतील, अशा भावनाही काही जणांकडून व्यक्त झाल्या.

दक्षिण मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनी अशा प्रकारे सामान्य बोगीतून प्रवास करून प्रवाशांबरोबर संवाद साधला.

लोकमत

सोयी-सुविधांनी सज्ज बोगी : आदेश नसल्याचे कारण पुढे करून विशेष निरीक्षण बोगीचा वापर

'दमरे'चा पुन्हा 'व्हीआयपी' थाट

लोकमत

व्हीआयपी संस्कृती मोडीत : पर्यटनाला बसणार चाप, स्लीपर बोगीतून करावा लागणार प्रवास

रेल्वे अधिकाऱ्यांची चंगळ होणार बंद

'लोकमत'मध्ये प्रकाशित केलेले वृत्त.

महत्त्वाचे

गिरीश महाजन यांच्या राजीनाम्याची मागणी

औरंगाबाद : जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी महिलांसंबंधीच्या काढलेल्या अनुदार उद्गारांचा राष्ट्रवादी महिला काँग्रेसने निषेध करून त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. आझाद चौकात महाजन यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन करण्यात आले. त्यात शहर अध्यक्षा मेहराज पटेल, उपाध्यक्षा मंजूषा पवार, शकीला खान, शमा परवेज, सबिया बाजी, सरताज सय्यद, झरिना बेगम, सलमा शेख, अनिता ठोंबरे आदींचा सहभाग होता.

मारोती तेगमपुरे यांची निवड



औरंगाबाद : जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथे तीन दिवस चाललेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४१ व्या राष्ट्रीय अधिवेशनात आमसभेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून डॉ. मारोती तेगमपुरे यांची बहुमताने निवड झाली. यासाठी झालेल्या निवडणुकीत १९८ पैकी ११९ एवढी मते डॉ. तेगमपुरे यांना पडली. पुणे विद्यापीठातील डॉ. मोहन चौधरी यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. डॉ. तेगमपुरे हे अंबड येथील गोदावरी वरिष्ठ कला महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

मतदार असताना नामांकन बाद कसे?

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभेसाठी प्राचार्य गटात मतदार म्हणून पात्र ठरलेले प्राचार्य डॉ. खुशाल मुंडे यांचे नामांकन बाद ठरविण्यात आले आहे. याविषयी त्यांनी अपिलाबाबतच्या लेखी निर्णयाची प्रत देण्याची मागणीही विद्यापीठाकडे केली आहे. जो मतदार असेल, त्याला उमेदवारी दाखल करण्याचा अधिकार भारतीय राज्यघटना देते. एकदा मतदार झाल्यानंतर त्या मतदाराला कोणीही उमेदवारीपासून वंचित ठेवण्यात येत नसल्याचे डॉ. मुंडे यांनी निवेदनात म्हटले आहे. मात्र विद्यापीठाने विद्यापीठ कायदा-२०१६ नुसार 'नॅक' मूल्यमापन केलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनाच उमेदवारी अर्ज करण्याची मुभा दिलेली असल्याचे म्हटले आहे.

...तर वार्षिक ७ कोटी रुपये वाचले असते

प्रशासनाची अनास्था : विद्यापीठ फंडातून करावे लागते वेतन; रिक्त जागा न भरल्यामुळे भुर्दंड

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ प्रशासनाने मागील साडेतीन वर्षांत एकही रिक्त जागा भरली नाही. चालू वर्षातील मे महिन्यापर्यंत रिक्त जागांच्या ५० टक्के जागा भरण्यास राज्य सरकारची परवानगी होती. ५० टक्के रिक्त जागा भरल्या असत्या तर किमान विद्यापीठ फंडातून द्यावा लागणारा ७ कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी वाचला असता, असा दावा शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष डॉ. कैलास पाथ्रीकर यांनी केला.

विद्यापीठात मागील साडेतीन वर्षांत एकाही पदाची पूर्णवेळ नेमणूक करण्यात आलेली नाही. प्राध्यापकांच्या रिक्त जागांचा आकडा १०५ झाला आहे, तर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांचा आकडा २५४ आहे. या रिक्त पदांमुळे बहुतांश कामे कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून करून घ्यावी लागत आहेत.

या कंत्राटी कर्मचारी आणि काही प्राध्यापकांना विद्यापीठ फंडातून वेतन द्यावे लागते. या वेतनाचा वार्षिक भार ७ कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे, तर महिन्याकाठी ७० लाख रुपये वेतनापोटी खर्च करावे लागतात. हे सर्व पैसे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्कासह इतर बाबींमधून जमा होतात. हा पैसा विद्यापीठ, विद्यार्थ्यांच्या विकासासाठी खर्च करणे अपेक्षित आहे; मात्र बहुतांश निधी प्राध्यापक आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनावरच खर्च करावा लागत आहे.

भाग-४

विद्यापीठाची 'मुदत ठेव' काढली

विद्यापीठाचा सर्व व्यवहार महाराष्ट्र बँकेतून करण्यात येत आहे. यासाठी विद्यापीठ परिसरात बँकेची शाखासुद्धा स्थापन केलेली आहे. या शाखेत विद्यापीठाने मागील अनेक वर्षांपासून विविध प्रकारांतून शिल्लक राहिलेल्या रकमेच्या मुदतठेवी ठेवल्या होत्या. यातील काही मुदतठेवी कुलगुरुंच्या आदेशाने मोडण्यात आल्या असल्याची धक्कादायक माहिती सूत्रांनी दिली. या मोडलेल्या ठेवीविषयी अधिकृत माहिती देण्यास अधिकाऱ्यांनी असमर्थता दर्शविली.

प्रशासनासह आर्थिक बाबतीतही पोखरले

विद्यापीठाचे प्रशासन पूर्णपणे कोलमडलेले असतानाच विद्यापीठाची आर्थिक शिस्तही बिघडलेली असल्याचे पाहणीत स्पष्ट झाले. कुलसचिवांचे अनधिकृत वेतन, दौऱ्यावर होणारी उधळपट्टी, बोगस बिल जोडण्याची सुरु झालेली परंपरा यातून आर्थिक शिस्त पूर्णपणे विस्कटली असल्याचे सूत्रांनी सांगितले. याबाबत ना कुलगुरुंना चिंता ना प्रशासनाला. सर्व काही रामभरोसे सुरु आहे.

(समाप्त)

नागपूर 'एजी'ने ओढले ताशेरे

विद्यापीठाचे ऑडिट करणाऱ्या नागपूर मुख्य लेखापरीक्षकाच्या (ऑडिटर जनरल) तपासणीत खळबळजनक माहिती समोर आली आहे. यात विद्यापीठ फंडातून कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वेतनावर प्रामुख्याने आक्षेप घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

औरंगाबाद महामॅरेथॉनमध्ये ग्रुप बुकिंगला सुरुवात

स्पर्धा १७ डिसेंबरला : प्रतिष्ठित नागरिक, दिग्गज खेळाडू धावणार

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : तंदुरुस्तीसाठी धावणे हा सर्वांसाठी जणू छंदच बनला आहे. मग याला औरंगाबाद शहर अपवाद कसे असेल? वैयक्तिक आणि सामूहिक नोंदणीवरही नागरिक, धावपटू, कंपन्यांतील कर्मचारी, महिला यांचा मोठ्या प्रमाणावर कल आढळून आलेला आहे.

यंदा सर्व संरक्षक दले, पोलीस, होमगार्ड आणि विशेष राखीव दलातील धावपटूंसाठी दिले जाणारे विशेष बक्षीसही या सॅफरॉन लॅण्डमार्क प्रस्तुत औरंगाबाद महामॅरेथॉनचे वैशिष्ट्य ठरणार आहे.

लोकमत समूहातर्फे याआधीही औरंगाबाद प्रीमिअर लीग, क्रीडा महोत्सव याचे यशस्वी आयोजन करताना खेळाडूंना एक मोठे व्यासपीठ मिळवून दिले आहे. यंदा १७ डिसेंबर रोजी होणारी औरंगाबाद महामॅरेथॉन आयोजित करून लोकमत समूहाने आणखी एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे.

त्यानुसार नागरिक व खेळाडूंना फिटनेससाठी प्रेरणा मिळावी आणि त्यांना प्रेरित करून सक्रिय फिटनेसवर लक्ष केंद्रित करावे. त्याचप्रमाणे एक शिस्तबद्ध धावपटू कशाप्रकारे यश प्राप्त करू शकतो, हे महामॅरेथॉनद्वारे सिद्ध करणे हादेखील लोकमत समूहाचा प्रमुख उद्देश आहे.

तसे पाहता मराठवाड्याची राजधानी ऐतिहासिक शहर औरंगाबादमध्ये तंदुरुस्तीविषयी जागरुकता निर्माण झाली आहे. दररोज आरोग्याची काळजी घेण्यासाठी आता शहरातील विविध क्रीडांगणांवर नागरिक, महिला, खेळाडू रनिंगचा सराव करून स्वत:चा फिटनेस उंचावत आहेत.

त्यामुळे एक रनिंग कल्चरलचा विकास या ऐतिहासिक शहरात निर्माण झाला आहे आणि लोकमत समूहदेखील ऐतिहासिक औरंगाबाद शहरात क्रीडा संस्कृती रुजवण्यासाठी आणि ती फुलवण्यासाठी एक महत्त्वाचे योगदान देत आहे. गतवर्षी लोकमत समूहातर्फे आयोजित मॅरेथॉनमध्येदेखील अनेक रनिंग ग्रुप सहभागी झाले होते आणि या वेळेस त्यात नक्कीच जास्तीची भर पडणार आहे.

ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरित्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
17 Dec 2017
Powered by DHOOT TRANSMISSION
Associate Sponsor riso
#MahaMarathon /MahaMarathon

औरंगाबाद 17/12/2017
कोल्हापूर 28/01/2018 | नागपूर 11/02/2018

स्पर्धा
Half Marathon - 21 Kms
Power Run - 10 Kms
Fun Run - 5 Kms
Family Run - 3 Kms

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

स्पर्धा	वयोगट	प्रकार
हाफ मॅरेथॉन 21 कि.मी.	१८ ते ४५	पुरुष (खुला गट-भारतीय)
	१८ ते ४०	महिला (खुला गट-भारतीय)
	४५ पुढील	पुरुष (वरिष्ठ गट-भारतीय)
	४० पुढील	महिला (वरिष्ठ गट-भारतीय)
	१८ ते ४५	पुरुष (परदेशी नागरिक)
	१८ ते ४०	महिला (परदेशी नागरिक)
पॉवर रन 10 कि.मी.	१८ ते ४५	पुरुष (खुला गट-भारतीय)
	१८ ते ४०	महिला (खुला गट-भारतीय)
	४५ पुढील	पुरुष (वरिष्ठ गट-भारतीय)
	४० पुढील	महिला (वरिष्ठ गट-भारतीय)
	१८ ते ४५	पुरुष (परदेशी नागरिक)
	१८ ते ४०	महिला (परदेशी नागरिक)

फन रन 05 कि.मी. — १२ वर्षांपुढील पुरुष, महिला, मुले, मुली सहभाग घेऊ शकतात.

फॅमिली रन 03 कि.मी. — आई-वडील व १२ वर्षांआतील दोन मुले

रनर कप — पुरुष (सर्व संरक्षक दले, पोलीस आणि विशेष राखीव दल)

रनर कप — महिला (सर्व संरक्षक दले, पोलीस आणि विशेष राखीव दल)

असा असणार मार्ग

- ◆ हाफ मॅरेथॉन गारखेडा परिसरातील विभागीय क्रीडा संकुलापासून सुरु होईल.
- ◆ ही मॅरेथॉन शहानूरमियां दर्गा, हॉटेल अमरप्रीत, सतीश मोटर्स शोरुममार्गे निराला बाजार येथे पोहोचेल.
- ◆ त्यानंतर धावपटू मिल कॉर्नर, आमखास मैदान, नौबत दरवाजा, किलेअर्क, दिल्ली गेट, हडको कॉर्नर, टीव्ही सेंटर, बळीराम पाटील हायस्कूल, बजरंग चौक, जळगाव रोड, हॉटेल लेमन ट्री, सेव्हन हिल पूल, गजानन महाराज मंदिर अशा मार्गाने जातील.

मॅरेथॉनचा समारोप विभागीय क्रीडा संकुलावर होईल.

प्राथमिक विभागाच्या प्रभारी शिक्षणाधिकाऱ्यांची खांदेपालट

तिसरे प्रभारी : उपशिक्षणाधिकारी लाठकर घेणार आज पदभार

लोकमत न्यूज नेटवर्क

पदभार सोडण्याची वाणी यांची होती पूर्वतयारी

- ◆ रवींद्र वाणी यांनी पदाधिकाऱ्यांच्या शिफारसींचा विचार न करता वेळप्रसंगी त्यांचा रोष स्वीकारत आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांना पदस्थापना दिल्या. आता जिल्ह्यांतर्गत बदल्यांची प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली आहे. बदली धोरणाविरुद्ध शिक्षक एकवटले आहेत. दोन-तीन दिवसांत बदल्यांचे आदेशही निघतील.
- ◆ आता शिक्षकांची ऑनलाइन भरती प्रक्रिया राबविली जाणार आहे. अशा परिस्थितीत शिक्षणाधिकारी पदाची सूत्रे स्वीकारण्याच्या हालचाली गतिमान झाल्या होत्या. ही बाब लक्षात येताच वाणी यांनी स्वत:हून अतिरिक्त कार्यभार सोडण्याविषयी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिवाळीपासून पूर्वकल्पना दिलेली होती.

औरंगाबाद : उपशिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर या उद्या मंगळवारी प्राथमिक विभागाच्या प्रभारी शिक्षणाधिकारीपदाची सूत्रे स्वीकारणार आहेत. यासंबंधीचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकरराजे आर्दड यांनी आज निर्गमित केले.

तथापि, प्रभारी शिक्षणाधिकारी रवींद्र वाणी हे ग्रामविकास विभागाच्या सचिवांसोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगमध्ये सायंकाळनंतर उशिरापर्यंत व्यस्त असल्यामुळे ते उद्या उपशिक्षणाधिकारी लाठकर यांच्याकडे कार्याचा भार सोपवणार असल्याचे वृत्त आहे.

अश्विनी लाठकर या कन्नड पंचायत समितीमध्ये गटशिक्षणाधिकारी पदावर कार्यरत होत्या. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून त्यांची निवड उपशिक्षणाधिकारीपदी झाली. त्यांनी जुलै महिन्यात उपशिक्षणाधिकारीपदाचा पदभार स्वीकारला. तत्पूर्वी, मार्चमध्ये तत्कालीन शिक्षणाधिकारी रहीम मोगल हे निवृत्त झाले, त्यामुळे माध्यमिक शिक्षण विभागातील ज्येष्ठ उपशिक्षणाधिकारी एम. के. देशमुख यांच्याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी आर्दड यांनी शिक्षणाधिकारीपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला होता. अडीच महिन्यांपूर्वी देशमुख यांची जालना येथे बदली झाल्यामुळे या पदावर कोणाची वर्णी लावावी, असा पेच जि.प. प्रशासनासमोर निर्माण झाला, तेव्हा फुलंब्री पंचायत समितीमध्ये कार्यरत ज्येष्ठ गटशिक्षणाधिकारी रवींद्र वाणी यांच्याकडे शिक्षणाधिकारीपदाचा अतिरिक्त पदभार सोपविण्यात आला.

दरम्यान, अशोक कडूस यांची पूर्णवेळ शिक्षणाधिकारी पदावर नियुक्ती झाली. मात्र अवघ्या दहा दिवसांतच ते बडतर्फ झाले. त्यानंतर पुन्हा वाणी यांच्याकडे पदभार देण्यात आला.

जि.प. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे उपशिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर नाराज झाल्या. शिक्षण विभागात उपशिक्षणाधिकारी कार्यरत असताना शिक्षणाधिकारीपदाचा अतिरिक्त पदभार एका गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे सोपविलेली बाब लाठकर यांच्या जिव्हारी लागली. यासंदर्भात त्यांनी विविध माध्यमांचा वापर करून शिक्षणाधिकारीपदाची सूत्रे आपल्याकडे घेण्याचे प्रयत्न केले. अखेर त्यांना यामध्ये यश आले. प्रशासनाने सोमवारी प्रभारी शिक्षणाधिकाऱ्यांची खांदेपालट करण्याचे आदेश निर्गमित केले. मोगल निवृत्त झाल्यापासून आजपर्यंत लाठकर या तिसऱ्या प्रभारी शिक्षणाधिकारी असतील.

तक्रार... जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. जी. एम. गायकवाड यांच्याकडे म्हणणे मांडताना विद्यार्थिनी.

नर्सिंगच्या विद्यार्थिनींचा सहा तास ठिय्या

आरोग्य उपसंचालक कार्यालय : प्राचार्या, पाठ्य निर्देशिका त्रास देत असल्याची तक्रार

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : पडेगाव येथील नर्सिंग ट्रेनिंग सेंटरमधील विद्यार्थिनींनी सोमवारी (दि.६) सकाळी ९ वाजेच्या सुमारास पालकांसह आरोग्य उपसंचालक कार्यालयात ठिय्या मांडला. प्राचार्या, पाठ्य निर्देशिका मानसिक त्रास देत असून, निवड आदेशपत्र देताना रक्कम उकळल्याची तक्रार करीत उपाशीपोटी आलेल्या विद्यार्थिनींनी सहा तास ठिय्या आंदोलन केले. जिल्हा शल्यचिकित्सकांनी कारवाईचे आश्वासन दिल्यानंतरच दुपारी ३ वाजेच्या सुमारास विद्यार्थिनी कार्यालयाबाहेर पडल्या.

प्राचार्या, पाठ्य निर्देशिका यांनी २०० रुपये घेऊन निवड आदेशपत्र दिले. ज्या विद्यार्थिनींकडे पैसे नव्हते, त्यांना अपमानास्पद वागणूक देण्यात आली.

एका विद्यार्थिनीने तर बकऱ्या विकून पैसे भरले. दहा हजार रुपये घेऊन प्रवेश देण्यात आल्याचा आरोप विद्यार्थिनींनी केला. त्यांच्या त्रासामुळे विद्यार्थिनी आजारी पडत आहेत. दररोज वर्गही होत नाही. त्रास अधिक होत असल्याने विद्यार्थिनींनी ही बाब पालकांना कळविली. सोमवारी नाश्त्याशिवाय सकाळी प्रशिक्षणासाठी बाहेर पडलेल्या विद्यार्थिनींनी पालकांसह थेट आरोग्य उपसंचालक कार्यालय गाठले. आरोग्य उपसंचालकांच्या कक्षासमोर ठाण मांडले. दुपारी २ वाजेपर्यंत त्यांची कोणीही बाजू ऐकून घेतली नाही. अखेर आरोग्य उपसंचालकांच्या अनुपस्थितीत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. जी. एम. गायकवाड यांनी कार्यालयात येऊन विद्यार्थिनींचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांच्या आश्वासनानंतर विद्यार्थिनी आल्या.

पदभार काढण्याची कारवाई

विद्यार्थिनींच्या तक्रारीमुळे प्राचार्यांचा पदभार काढण्याची कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. जी. एम. गायकवाड यांनी दिली. याविषयी प्राचार्या थोरात यांच्याशी संपर्क साधला असता विद्यार्थिनींनी लावलेले सर्व आरोप चुकीचे असल्याचे त्या म्हणाल्या.

फुले-आंबेडकर वाङ्मय कोश निर्मितीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : 'महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सर्वव्यापी असून, समाजातील दुर्बल, वंचित, उपेक्षित, दलित, महिला, शेतकरी, गोर-गरिबांच्या कल्याणाचे आहेत. या विचारांनी प्रभावित होऊन लेखन केलेल्या साहित्यिकांचा आजच्या समाजाला परिचय व्हावा यासाठी 'फुले-आंबेडकर वाङ्मय कोश' तयार करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे, अशी माहिती डॉ. महेंद्र भवरे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी डॉ. उत्तम अंभोरे व प्रा. ज्ञानेश्वर कांबळे उपस्थित होते.

या वाङ्मय कोशामध्ये आंबेडकरपूर्व, आंबेडकरकालीन आणि आंबेडकरोत्तर अशा तीन कालखंडामध्ये लिखाण केलेले फुले-आंबेडकरवादी लेखक, त्यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान, त्यांच्या साहित्याचे महत्त्व आदींचा समावेश करण्यात येणार आहे. सुमारे दीड हजार पानांच्या या कोशामध्ये २०१५ पर्यंतचे सहाशे-सातशे लेखकांचा समावेश करण्यात येणार आहे.

डॉ. भवरे प्रकल्पप्रमुख आणि मुख्य संपादक आहेत. सल्लागार मंडळात डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, प्रा. अविनाश डोळस, अर्जुन डांगळे, डॉ. मनोहर जाधव आहेत. म. फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे चालत राहावा या हेतूने हा कोश निर्माण केला जात आहे. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन लिहिते झालेल्या साहित्यकारांचे कार्य विस्मृतीत जाऊ नये हादेखील प्रकल्पाचा उद्देश असल्याचे डॉ. भवर यांनी सांगितले.

'धनगर समाजाने राजकीय नेत्यांना बळी पडू नये'

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : धनगर समाजाला आरक्षण देण्याच्या मुद्याचे राजकारण करून राजकीय नेत्यांनी केवळ आपला स्वार्थ साधला आहे. त्यामुळे समाजाचे नुकसानच झाले आहे. त्यामुळे सर्व धनगर समाजातील लोकांनी सजग होऊन येथून पुढे नेत्यांच्या भूलथापांना बळी न पडण्याची काळजी घेणे गरजेचे असल्याचे सौरभ हटकर यांनी म्हटले. 'मेंढपाळ पुत्र आर्मी'तर्फे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी ॲड. सुभाष माने उपस्थित होते.

खा. विकास महात्मे यांनी आयोजित केलेल्या 'आरक्षण निर्णायक' मेळाव्याला समाजातील नागरिकांनी सहभागी होऊ नये, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कमला भसीन : विद्यापीठात 'पुरुष आणि पुरुषत्व' या विषयावर परिसंवाद

पितृसत्तेतून पुरुषांचे 'इमोशनल कॅस्ट्रेशन'

लोकमत न्यूज नेटवर्क



औरंगाबाद : पितृसत्ता पद्धती केवळ स्त्रियांचेच शोषण करीत नाही. पितृसत्तेचे लाभधारक असणाऱ्या पुरुषांचेदेखील शोषण करते. पुरुषाने रडू नये, भावना व्यक्त करू नयेत, स्वयंपाक करू नये, विविध कला शिकण्यास पुरुषांना मज्जाव केला जातो. हा मज्जाव म्हणजेच पुरुषांचे 'इमोशनल कॅस्ट्रेशन'च (भावनिक नपुंसक करणे) होय, असे प्रतिपादन प्रसिद्ध स्त्री अभ्यासक कमला भसीन यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रातर्फे 'पुरुष आणि पुरुषत्व' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेत राष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या स्त्री अभ्यासक कमला भसीन यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्षस्थानी केंद्राच्या संचालिका डॉ. स्मिता अवचार होत्या. विद्यापीठात काही दिवसांपूर्वी दोन तरुणांनी प्रेमसंबंधातून आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. या घटनांचे विश्लेषण करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले होते. यावेळी कमला भसीन म्हणाल्या, लिंग, लिंगभाव, पितृसत्ताकत्मकता, स्त्रीत्व, पुरुष या संकल्पना स्त्री-पुरुषांच्या व्यक्तित्व घडणीतील महत्त्वाच्या गोष्टी आहेत.

स्त्रियांवर सद्य:स्थितीत वाढत्या अत्याचारांच्या घटनांची मांडणी करताना त्यांनी 'मुलींना हुंडा देऊ नका, पण संपत्तीमध्ये हक्क दिला पाहिजे' यावर जोर दिला.

जागतिकीकरण, भांडवलशाहीमुळे स्त्री देहाचे वस्तुकरण करून बाजार मांडला जात असल्याची खंतही कमला भसीन यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये डॉ. अवचार यांनी ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. प्रा. निर्मला जाधव यांनी सूत्रसंचालन केले.

प्रा. आश्विनी मोरे यांनी आभार मानले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रा. निर्मला जाधव, प्रा. आश्विनी मोरे, संतोष लोखंडे, विकास राचले, संजय पोळ यांच्यासह विद्यार्थी दादासाहेब कांबळे, भारती खोतकर, विकास डोंगरदिवे, प्रवीण सरकटे आदींनी सहकार्य केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पदवीधर अधिसभेसाठी उत्कर्ष पॅनल करणार शक्तिप्रदर्शन

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पदवीधर गटातील अधिसभेसाठी उत्कर्ष पॅनलतर्फे बुधवारी दुपारी दोन वाजता जोरदार शक्तिप्रदर्शन करून नामांकन दाखल करण्यात येणार आहे. विद्यापीठ प्रवेशद्वारापासून ते प्रशासकीय इमारतीपर्यंत रॅली काढण्यात येणार असल्याची माहिती भारत खैरनार यांनी दिली.

Govt Reg.No.7342
पेन केअर इंस्टीट्युट
ऑर्थोपेडीक सर्जन द्वारे सल्ला व उपचार
सांधेवात, गुडघेदुखी, मान, पाठ, कंबरदुखी मायग्रेन (डोकेदुखी), फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी) सायटीका, स्लिप डिस्क, टाचदुखी, टेनिस ऐल्बो हातापायात मुंग्या येणे
अपना बाजार, बाफना ज्वेलर्स समोर, जालना रोड, औरंगाबाद.
9822899660, 9422713387, 9767442040
(कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे) सोमवार ते शुक्रवार फक्त

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. अॅझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
आशाकिरण क्लिनीक १९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521